## चातुर्मासनिमित्त पू. श्री. विश्वदर्शनाजी म.सा. यांचा गुरुवारी मंगल प्रवेश



संगमनेर (वार्ताहर) : जैन परंपरेच्या चातुर्मास रविवार दि. ०२ जुलै पासुन सुरु होत असुन संगमनेर येथील जैन स्थानकामध्ये प्रखरव्याख्याता पू. श्री. विश्वदर्शनाजी म.सा. व विद्याभिलाषी पू. श्री. तिलकदर्शनाजी म.सा. या साध्वींचा चातुर्मास होणार आहे अशी माहिती संगमनेर संघाचे संघपती शिरीष दर्डा व चातुर्मास समितीचे अध्यक्ष राजकुमार पारख यांनी दिली.

चातुर्मासनिमित्त साध्वीजींचा मंगल प्रवेश आज गुरुवार दि. २९ जुन रोजी आनंद नागरी सहकारी पतसंस्था पासुन शोभा यात्रेने जैन स्थानक, सुयोग सोसायटी, संगमनेर येथे सकाळी ८.३० ला आगमन होणार आहे. मंगल प्रवेश निमित्त सकल जैन समजाला गौतम प्रसादीचे आयोजन करण्यात आले आहे. त्यांच्या मंगल प्रवेश व शोभा यात्रेमध्ये सकल जैन समाज व नागरीकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन श्री स्थानकवासी जैन संघ संगमनेरच्यावतीने संघाचे विश्वस्त श्री.वसंत फिरोदिया व प्रफुल्ल बोगावत यांनी केले आहे. चातुर्मास यशस्वी करण्यासाठी जैन युथ फेडरेशन, जैन सोशल लेडी ग्रुप, कन्या मंडळ आदि प्रयत्नशिल आहे. चातुर्मास काळात सर्वांनी प्रवचनाचा लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी केले आहे.

# महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाच्यावतीने राज्यस्तरीय महामंडळ अधिवेशन २ जुलै २०२३ रोजी

**अहमदनगर (युवा ध्येय)**

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाच्या (शिवाजी रावपाटील प्रणित) वतीने राज्यस्तरीय महामंडळ अधिवेशन २ जुलै २०२३ रोजी सकाळी १० वा नगर येथे होत आहे जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षकांनी हजारोंच्या संख्येने या महामंडळासाठी उपस्थित रहावे, असे आवाहन राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष माधव हासे यांनी केले आहे.

या महामंडळासाठी उद्घाटक म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्रजी पवार हे राहणार असून प्रमुख पाहुणे म्हणून विधान सभेचे विरोधी पक्षनेते ना अजितदादा पवार प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील व अनेक आमदार तसेच राज्याचे शिक्षक नेते माधवराव पाटील राजाराम वरुटे बाळासाहेब काळे राज्याध्यक्ष केशवराव जाधव कोषाध्यक्ष संभाजी बापट उपस्थित राहणार आहेत.

जुनी पेन्शन योजना लागु करणे केंद्रप्रमुख विस्तार अधिकारी पदोन्नती तातडीने करणे वरीष्ठ व निवड श्रेणी मंजूर करणे सेवानिवृत्तांच्या थकीत रकमेसाठी निधी उपलब्ध करून देणे.

जिल्हांतर्गत बदल्यांच्या नवीन धोरणाबाबत भूमिका निश्चित करणे मुख्यालयी राहण्याची अट रद्द करणे.

ऑनलाईन माहित्यां कमी करणे आदि सह १७ मांगण्या बाबत या महामंडळात चर्चा करून ठराव घेतले जाणार आहेत.

राज्य स्तरीय महामंडळाला अनेक वर्षानंतर मा. पवार साहेब यांची उपस्थिती शिक्षकांना प्रोत्साहन देणारी असून गुरु पौर्णिमेच्या पूर्वसंध्येला हे म ान्यवर शैक्षणिक समस्या जाणून घेणार आहेत.

राज्यातून दहा हजार प्राथमिक शिक्षक कार्यकर्ते या महामंडळासाठी उपस्थित राहणार आहेत. तरी नगर जिल्ह्यातील वाडी वस्तीवर काम करणाऱ्या सर्व शिक्षकांनी या महामंडळाला मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपल्या एकजुटीचे दर्शन घडवावे, असे आवाहन शिक्षक नेते राजेंद्र शिंदे, रवींद्र पिंपळे, नारायण राऊत, नवनाथ तोडमल, बाबासाहेब आव्हाड, भास्कर कराळे, ज्ञानेश्वर माळवे, बबन गाडेकर, गजानन ढवळे, बाळासाहेब खिलारी, चंद्रकांत मोढवे, राजेंद्र कुदनर, पांडुरंग काळे, सुनील सोनवणे, संतोष दळे, कल्याण शिंदे, गईनाथ शिरसाठ, संतोष गायकवाड, बाळकृष्ण कंटाळी, चंद्रकांत मोरे, राजाभाऊ बेंद्रे यांनी केले आहे.

# आबासाहेब काकडे शिक्षणशास्त्र विद्यालयात कर्मयोगी आबासाहेब यांचा जयंती सोहळा सुरु



शेवगाव ता युवा ध्येय: येथील आबासाहेब काकडे शिक्षणशास्त्र विद्यालयात संस्थेचे संस्थापक कर्मयोगी जगन्नाथ कान्होजी उर्फ आबासाहेब काकडे यांची १०४ वी जयंती निमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता याप्रसंगी सुरुवातीला आबासाहेब काकडे शिक्षणशास्त्र विद्यालयचे प्राचार्य श्री अरुण चोथे यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले त्यानंतर प्रा.आर.आर. शेळके यांनी प्रास्ताविक केले.

छात्र शिक्षक-शिक्षिका यांच्या मनोगतामध्ये कु.साळवे राखी, कु.रंधवे सोनिया आणि हनवते योगेश यांनी आबासाहेबांनी विषयी आपले विचार व्यक्त केले. प्राध्यापकांच्या मनोगतामध्ये जेष्ठ प्रा.आदिनाथ अव्हदाते यांनी आबासाहेबांचे जीवन चरित्र विषयी आपले विचार मांडले.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य अरुण चोथे यांनी आबासाहेबांचे विचार आणि शैक्षणिक कार्य याविषयी उपस्थितांना संबोधित करत आबासाहेबांचा संपूर्ण जीवनपट शब्दरूपाने मांडला.

प्रा.अमोल गायकवाड यांनी आभार प्रदर्शन केले या कार्यक्रम प्रसंगी प्रा.प्रमोद फलके, प्रा. श्रीमती शितल शेरकर, प्रा.श्रीमती हर्षदा सातपुते,शिक्षकेतर कर्मचारी श्रीमती मनीषा शेळके,शुभम काते आणि डी.एड.चे विद्यार्थी-विद्यार्थीनी उपस्थित होते.

# अकोले तालुक्यातील बस सेवा सुरळीत करा अन्यथा भव्य एल्गार



**अकोले (युवा ध्येय)**

अकोले तालुक्यातील बस आगाराच्या गलथान कारभाराच्या विरोधात शेतकरी पुत्रांचा भव्य एल्गार अकोले तालुक्यात या आधीपासून सुरु असलेल्या सर्वच्या सर्व बसेस नव्याने सुरु कराव्यात, विद्यार्थ्यांसाठी जादा बसेस सुरु कराव्यात या आधी साठ-सत्तर असलेल्या बसेसची संख्या आता अर्धी तीस वरती आलेली असून अकोले आगारासाठी नविन बसेसची संख्या वाढवावी या मागणीसाठी आगार प्रमुख अकोले यांना निवेदन देऊन प्रत तहसिलदार साहेब अकोले व आमदार डा कीरण लहामटे साहेब यांना देण्यात आली. लवकरात लवकर तोडगा काढावा अन्यथा बस स्थानक अकोले या ठीकाणी तंबू ठोकून अमरण उपोषन करण्यात येईल असे निवेदन देण्यात आले असून लवकरात लवकर येथील बसेस सुरळीत करा. प्राधान्याने तालुका अंतर्गत प्रवासी व विद्यार्थ्यांची सोय करा येथील गाड्या तालुक्याच्या बाहेर गेल्या नाही तरी चालतील परंतु गोर गरीब आदिवासी शेतकरी, विद्यार्थी, जेष्ठ नागरीक यांची गैरसोय थांबवा अन्यथा भव्य एल्गार करणार असल्याचे सुरेश नवले यांनी बोलताना सांगितले.

दैनिक युवा ध्येय (MAHMAR 40112) हे एम मालक, मुद्रक, प्रकाशक निवृत्ती ... यांनी मुद्रक कुलभूषण रामकृष्ण ... सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड प्लॉट नंबर ए-१४, एमआयडीसी, रेल्वे स्टेशन रोड, औरंगाबाद-४३१००५ येथे छापून बी-६४, अंबर प्लाझा बेसमेंट, ... अहमदनगर ४१४००१ येथे प्रकाशित केले. ऑफिस फोन (0241-2323444) Email-yuvadhyeya@gmail.com www.yuvadhyeya.com